# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/08/2023 (गुरूवार) सकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा श्रीकृष्ण नगर व्ही. व्ही निकेतन शाळेच्या बाजुला, वार्ड क्र. ०३ बोरी येथे दिनांक १४/०८/२०२३ चे १५.०० वा. ते दिनांक १६/०८/२०२३ चे १०.१० वा. सुमारास फिर्यादी नामे– पंकज यशवंतराव गावंडे, वय ४० वर्ष रा. श्रीकृष्ण नगर व्ही. व्ही निकेतन शाळेच्या बाजुला, वार्ड क्र. ०३ बोरी याचे घरी कोणीही हजर नसतांना कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या घराच्या दरवाजाचे कुलुप तोडुन घराचे आत प्रवेश करून घराचे बेडरूममधील कपाटातुन फिर्यादिचे मुलीचे गुल्लक फोडुन २०००/– रू. व पत्नीच्या पर्समधील १००००/– रू. असे एकुण १२०००/– रू. चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक सुरेश गाते मो. नं. ९९२३०२७२१४ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. एम आय डी सी बोरी** :– अंतर्गत एके इंटरप्रायजेस बेसन मील समोरील बंद पडलेली कंपनी MIDC बोरी येथे दिनांक १४/०८/२०२३ ते दिनांक १५/०८/२०२३ चे २२.०० वा. ते ०६.०० वा. चे दरम्यान फिर्यादी नामे– सुशील भाईराम पांडे, रा. गणेशपुर वार्ड नं. ७ एम. आई. डी. सी. बोरी, ता. हिंगना हे एके इंटरप्रायजेस बेसन मील समोरील बंद पडलेली कंपनी मध्ये सुपरवायजरचे काम करतात. दिनांक १५/०८/२०२३ रोजी कंपनीत गेले असता कंपनीच्या आतमध्ये खुल्या जागेवरील शेड मध्ये ठेवलेले १) बंद पडलेली मोठया साईजची वेल्डींग मशीन किंमत २०,०००/– रू २) मोटर १० हॉर्स पावर किंमती १५०००/–रू ३) ०२ चाळण्या लोखंडी किंमती ८०००/–रू ४) लोखंडी कबाड व नट किंमती १००००/–रू. असा एकुण ५३,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अनोळखी चोरांनी चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एम आय डी सी बोरी येथे आरोपीविरुद्ध कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर राय हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर